महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, सांगली

जिल्हा क्रीडा संकुल,वसतीगृह इमारत, सांगली-मिरज रोड, सांगली

फोन नं. - ०२३३/२९९०६१६ इ. मेल- dsosport_sangli@rediffmail.com

जा. क्र.राशाक्रीस्प/टेनिक्वाईट/२०२३-२०२४/ 1906 दिनांक: २१ नोव्हेंबर, २०२३

प्रति,

मा. जिल्हा क्रीडा अधिकारी (सर्व)

महाराष्ट्र राज्य.

## सुधारीत -

विषय : राज्यस्तरीय शालेय टेनिक्वाईट क्रीडा स्पर्धा आयोजन, सन २०२३-२०२४
(१४, १७ व १९ वर्षाखालील मुले व मुली)

संदर्भः — १. मा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील पत्र क्र. क्रीयुसे/शाक्रीस्प/आयोजन/२०२३-२४/का-४/३१४५ दि. १५/०९/२०२३.

२. या कार्यालयाचे पत्र क्र. राशाक्रीस्प/टेनिक्वाईट/२०२३-२०२४/१९०१ दिनांक: २० नोव्हेंबर, २०२३

महोदय,

क्रीडा व युवक सेवा संचालनालय, जिल्हा क्रीडा परिषद, सांगली यांच्या वतीने राज्यस्तरीय शालेय टेनिक्वाईट क्रीडा स्पर्धा (१४, १७ व १९ वर्षाखालील मुले व मुली) आयोजन खालील कार्यक्रमानुसार करण्यात येणार आहे. कृपया या कार्यक्रमानुसार आपल्या विभागाच्या खेळाडूंना स्पर्धेसाठी उपस्थित राहण्याबाबत सूचित करावे.

॥ राज्यस्तरीय शालेय टेनिक्वाईट क्रीडा स्पर्धा कार्यक्रम (१४,१७ व १९ वर्षाखालील मुले व मुली) ॥

| | |
|---|---|
| स्पर्धा कालावधी | दि. ०८ ते १० डिसेंबर २०२३ |
| उपस्थिती दिनांक | दि. ०८ डिसेंबर २०२३ सकाळी १०.०० वाजेपर्यंत |
| स्पर्धा | दि. ०८ डिसेंबर २०२३ दुपारी २.०० वा. पासून |
| निवडचाचणी उपस्थिती दिनांक | दि. ०९ डिसेंबर २०२३ सकाळी १०.०० वाजेपर्यंत |
| निवडचाचणी दिनांक | दि. ०९ डिसेंबर २०२३ दुपारी २.०० वाजेपासून |
| उपस्थिती स्थळ | श्री भानू तालीम संस्था, ब्राम्हणपुरी, मिरज ता. मिरज, जि. सांगली. |
| भोजन व्यवस्था व निवास व्यवस्था | उपस्थितीच्या ठिकाणी कळविण्यात येईल. |

स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडूंची विभाग निहाय संख्या.

| अ. क्र. | खेळ | १४ वर्षाखालील | | १७ वर्षाखालील | | १९ वर्षाखालील | | संघ व्यवस्थापक | एकूण संख्या |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुले | मुली | मुले | मुली | मुले | मुली | | |
| १ | टेनिक्वाईट | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ५ | ६ | ३६ |

❖ स्पर्धा आयोजनाबाबत खेळाडू, संघ व्यवस्थापक व क्रीडा मार्गदर्शक यांच्यासाठी महत्वाच्या सूचना/नियमावली :-

१. राज्यस्तर शालेय टेनिक्वाईट क्रीडा स्पर्धा क्रीडा व युवक सेवा संचालनालय, भारतीय शालेय खेळ महासंघ व भारतीय टेनिक्वाईट महासंघ यांच्या मार्गदर्शक तत्वानुसार व नियमांनुसार आयोजित करण्यात येतील.

२. स्पर्धेस आवश्यक क्रीडा साहित्य (स्वतःचे) खेळाडूंनी सोबत आणावे. गणवेश व कीट असणे आवश्यक आहे.

३. स्पर्धेत सहभागी होणा-या खेळाडूंची संख्या वरील तक्त्यात नमुद केली आहे. त्या संख्येनुसार अधिकृत प्रवेशिकेत नमूद खेळाडू व संघ व्यवस्थापकांना निवास व भोजनाची सुविधा उपलब्ध केली जाईल.

४.संघ व्यवस्थापकाकडून निवासस्थानी अनामत रक्कम रुपये १,०००/- स्वीकारली जाईल. निवासाच्या ठिकाणी नुकसान व मोडतोड आढळून आल्यास अनामत रक्कमेतून योग्य ती नुकसान भरपाई वसूल करण्यात येईल.

५. स्पर्धेपुर्वी, स्पर्धेदरम्यान, स्पर्धा परीसरात, स्पर्धा संपल्यानंतर एखाद्या खेळाडूस गंभीर इजा किंवा कोणत्याही प्रकारची दुखापत/ हानी झाल्यास त्यास स्पर्धा आयोजन समिती जबाबदार राहणार नाही. त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित खेळाडू व संघ व्यवस्थापक यांची राहील.

६. निवासासाठी प्रत्येक खेळाडूजवळ पुरेसे अंथरुण, पांघरुण तसेच दैनंदिन वापराच्या उदा. कुलुप, किल्ली इ. असणे आवश्यक आहे.

७. खेळाडूंसोबत कोणत्याही मौल्यवान वस्तु/ साहित्य असू नये, अशा वस्तुंची कोणत्याही प्रकारची जबाबदारी आयोजक अथवा आयोजन समिती स्वीकारणार नाही.

८. उदघाटन व समारोप प्रसंगी प्रत्येक विभागाचा ध्वज व नामफलक संघासोबत असणे आवश्यक आहे, तसेच प्रत्येक खेळाडूने उद्घाटन प्रसंगी संचलनात सहभागी असणे आवश्यक आहे.

९. स्पर्धा आयोजनाबाबतचे सर्वाधिकार राज्यस्तर टेनिक्वाईट क्रीडा स्पर्धा आयोजन समितीने राखून ठेवले आहेत. उपस्थितीनंतर संघ व्यवस्थापकांच्या बैठकीला सर्व संघ व्यवस्थापकांनी हजर राहणे अनिवार्य आहे.

१०. स्पर्धास्थळी स्पर्धेदरम्यान जीवित वा वित्तहानी झाल्यास आयोजक व आयोजन समिती जबाबदार राहणार नाही, त्यादृष्टीने सर्व खेळाडू, व्यवस्थापक व क्रीडा मार्गदर्शक यांनी काळजी घ्यावी.

११. वैद्यकीयदृष्ट्या अपात्र असणा-या खेळाडूंनी स्पर्धेत सहभागी होऊ नये, वैद्यकीय दाखला सोबत असावा.

१२. आयोजन समितीमार्फत गठीत तक्रार निवारण समितीचा निर्णय अंतिम राहील.

१३. (१) खेळाडू सोबत ओळखपत्र (Eligibility Certificate) मुख्याध्यापक/ प्राचार्य यांचे सही शिक्कयानिशी असणे आवश्यक आहे. (त्यामध्ये खेळाडूचे नांव, वडीलांचे नाव, जन्मतारीख, इयत्ता, शाळेचे नांव, रजिस्टर क्र., खेळ वयोगट असणे आवश्यक आहे.) (२) सदर ओळखपत्रावर जिल्हा क्रीडा अधिकारी यांची प्रतिस्वाक्षरी असणे अनिवार्य आहे.
(३) जन्मतारीख निश्चीत करण्यासाठी खालीलपैकी एक पुरावा असणे अनिवार्य आहे :-
अ. संबंधित खेळाडूचे वय १ वर्षापर्यंत असताना संबंधित शासकीय विभागाने वितरीत केलेला जन्मदाखला. किंवा . . .
ब. संबंधित खेळाडूचे वय किमान ५ वर्षापर्यंत असताना संबंधित शासकीय विभागाने वितरीत केलेला जन्मदाखला. किंवा . क. संबंधित खेळाडूच्या वयाची ५ वर्षे पुर्ण झाल्यानंतर संबंधित शासकीय विभागाचा जन्मदाखला असेल तर खेळाडूच्या १ ल्या इयत्तेतील प्रवेश घेतलेल्या जनरल रजिस्टरची सत्यप्रत अनिवार्य.
*** वरीलपैकी एका जन्मपुराव्यासोबत खालीलपैकी एक कागदपत्र असणे अनिवार्य आहे. १. आधारकार्ड, २. पासपोर्ट.
संबंधित खेळाडूचा शालेय प्रवेश अर्ज, जन्मदाखला, १ ल्या इयत्तेतील जनरल रजिस्टरमधील जन्मतारीख व आधारकार्ड तथा पासपोर्ट यामधील नमूद जन्मतारीख सारखीच असणे आवश्यक आहे. (४) स्पर्धेला निघण्यापुर्वी उपरोक्त संपर्क क्रमांकावर संपर्क करुन निघावे. (५) <u>१४ वर्षाआतील खेळाडूसाठी वैद्यकीय दाखला अनिवार्य आहे.</u>

१४. विभागाचे प्रवेश अर्ज दि. ०५ डिसेंबर २०२३ पर्यंत या कार्यालयास पोस्टाने अथवा इ-मेल dsosport_sangli@rediffmail.com पाठवावेत.

१५. संपर्क : **श्रीमती. आरती हळींगळी, क्री.मा. - ८४११९४२४२४, श्री. प्रशांत पवार, क्री. मा. — ९८२२३५६१९७, श्रीमती. सीमा पाटील, क्री.मा. — ९४०३१२३७४३, श्री. एल. जी. पवार, क्री. अ. - ९४२२४ २४१८५, श्री. बालाजी बरबडे, क्री. अ.- ९६७३४ ५१११५, श्री. जमीर अत्तार, क्री. मा. — ९८२३९२०२१८, श्री. अमोद भिडे, संघटक - ९०९६१६१३६२, श्री. प्रविण रसाळ, संघटक — ८४२११९४७१९.**

१६. कृपया राज्यस्तर स्पर्धेसाठी नियमानुसार पात्र ठरणा-या खेळाडू/ संघाना उपरोक्त व योग्य त्या सूचना देऊन स्पर्धेस उपस्थित राहण्याबाबत या पत्रातील नमूद सूचनांसह कळविण्यात यावे, अशी विनंती आहे.

आपला विश्वासू

21.11.23

( किरण बोरवडेकर )
जिल्हा क्रीडा अधिकारी,
सांगली.

प्रत माहितीस्तव सविनय सादर : -

१. मा. आयुक्त, क्रीडा व युवक सेवा, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा क्रीडा परिषद, सांगली.
३. मा.उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, मुंबई/नाशिक/पुणे/औरंगाबाद/लातूर/अमरावती/नागपूर/कोल्हापूर.
४. मा. जिल्हा क्रीडा परिषद सदस्य (सर्व), जिल्हा क्रीडा परिषद, सांगली.